## नमुना - ७अ

*[ कलम १९ ब (६) पहा ]*

## संपादित जमिनीतील हितसंबंधाबाबत जमीन मालकांचे किंवा हितसंबंधित व्यक्तींचे अर्ज मागविण्यासाठी जाहीर नोटीस

क्रमांक क्र.कावि/ल.ले./समृध्दी महामार्ग/१६०/२०२१,दिनांक १०.०३.२०२१ उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेहकर ज्याअर्थी, राज्य शासनाने, शासकीय अधिसूचना, क्रमांक खाक्षेस – २०१६/प्र.क्र. २५१ (एल.बी.४६) एल /रस्ते – ८ दिनांक ०३ डिसेंबर २०२० अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१)अन्वये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग (राज्य महामार्ग विशेष क्र. २) या महामार्गाचे बांधकाम करणे या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यासाठीच्या संपादनाच्या घोषणेची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १९ ब च्या पोट-कलम (६) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकृत अधिकारी, याद्वारे, खालील निर्देश देत आहे.

(एक) जमीन मालकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना अनुसूचींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील हितसंबंधाचे दावा सांगणारे अर्ज मागवित आहे.

(दोन) ज्यांच्या जमिनीचा संपादनामध्ये समावेश करण्यात आला आहे त्या जमीन मालकांनी किंवा हितसंबंधित व्यक्तींनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील हितसंबंधाचे स्वरुप आणि त्यासंबंधातील भरपाईवर सांगितल्या जाणाऱ्या त्यांच्या दाव्याची रक्कम व तपशील याबाबींचे अर्ज करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, मेहकर यांचे कार्यालयात दिनांक २९/०३.२०२१ पर्यंत उपस्थित राहावे.

२. महामार्गाचे बांधकाम करणे यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत ही महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये व प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत जमीन मालकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे आणि तसेच या प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हितसंबंधाचे दावा सांगणाऱ्या अर्जांची चौकशी प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल आणि संबंधित अर्जदारास त्याच्या अर्जाच्या समर्थनात तोंडी वा कागदोपत्री पुरावा सादर करण्यासाठी जातीने किंवा वकीलामार्फत किंवा कोणत्याही कायदेशीर व्यक्तीमार्फत प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर उपस्थित राहण्याची मुभा असेल.

४. सदर जमिन संपादनाबाबत आपण संमती दिल्यास जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने आपणास भुसंपादन अधिनियमानुसार मिळणाऱ्या मावेजा / मोबदला रकमेच्या २५% रक्कम अधिकची देण्यात येईल. तथापि, संपदीत जमिनीची मालकी / ताबा निर्विवाद असल्याबाबतची खात्री करुन द्यावी लागेल.

# अनुसूची

## संपादित जमिनीचा तपशील

गावाचे नाव :- गौंढाळा      तालुका :- मेहकर      जिल्हा बुलढाणा

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गाव | सर्व्हे क्र./ गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ८८ | ०.००१६ |
| २ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ८९ | ०.००९७ |
| ३ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ९० | ०.०७९९ |
| ४ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ९१ | ०.१५०७ |
| ५ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ९२ | ०.३२८४ |
| ६ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ९३ | ०.३३५५ |
| ७ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ९४ | ०.२७४१ |
| ८ | बुलढाणा | मेहकर | गौंढाळा | ११९ | ०.०५३१ |

दिनांक :- १०/०३/२०२१

ठिकाण :- मेहकर

Sub Divisional Officer and Land Acquisition * Mehkar *

सत्यमेव जयते

उपविभागीय अधिकारी तथा,
भूसंपादन अधिकारी, मेहकर

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी मेहकर